(फक्त कार्यालयीन उपयोगासाठी)

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## नियामक मंडळाची ४८वी बैठक

दिनांक १३/६/२०१४

## बैठकीत मान्य झालेले ठराव

तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
## नियामक मंडळाची ४८वी बैठक
### दिनांक १३/६/२०१४
### - बैठकीचे कार्यवृत्त -

तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ४८वी बैठक दिनांक १३/६/२०१४ रोजी दुपारी ४:०० वा. मा.मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे विकास महामंडळ वगळून) व अध्यक्ष, तापी पाटबंधारे विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री महोदय यांच्या विधानभवनातील कक्षात संपन्न झाली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे मा.मंत्री, सन्माननीय सदस्य तसेच महामंडळाचे निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**अ) नियामक मंडळाचे अध्यक्ष व सदस्य**

१) मा.ना.श्री.सुनिल तटकरे - मा.मंत्री, जलसंपदा (म.कृ.खो.पा.महामंडळ वगळून) व पदसिद्ध अध्यक्ष

२) श्री.ए.बा.पाटील - मा.प्रधान सचिव (जसं) व व्यवस्थापकीय संचालक

३) श्रीमती मालिनी शंकर - मा.प्रधान सचिव (लाक्षेवि)

४) श्री.प्र.रा.भामरे - कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

**क) निमंत्रित अधिकारी**

१) श्री.ह.मे.शिंदे - मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव

२) श्री.पी.एम.गवळी - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, तापाविम, जळगाव

३) श्री.एस.एन.कुलकर्णी - प्रभारी अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगाव

मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात झाली.

कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी सुरुवातीस सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीच्या विषयसूचीचे विषयवार वाचन केले. बैठकीचा कार्यवृत्तांत पुढीलप्रमाणे आहे.

**विषय क्र.४८.१- नियामक मंडळाच्या दिनांक २४/२/२०१४ रोजी झालेल्या ४७व्या बैठकीत पारित झालेले ठराव वाचून कायम करणेबाबत.**

कार्यकारी संचालक यांनी ४७व्या बैठकीत झालेल्या ठरावांचे त्याअंतर्गत पार्श्वभूमीसह व ठरावांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीसह वाचन केले. चर्चेअंती ४७व्या बैठकीत पारित झालेले ठराव क्र- ४७.१ ते

"मान्य"

| | |
|---|---|
| [प्र.रा.भामरे] | [सुनिल तटकरे] |
| कार्यकारी संचालक व सदस्य सचिव | मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |

४७.१३ कायम करण्यात आलेत. त्यानुषंगाने सर्वानुमते ठराव क्र-४८.१ पारित करण्यात आला.

ठराव क्र.४७.२- ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या दिनांक २४/२/२०१४ रोजी झालेल्या ४६व्या बैठकीत पारित झालेले ठराव क्र-४६.१ ते ४६.१६.२ वाचून कायम करण्यात येत आहे.

ठराव क्र.४७.२- ठराव करण्यात येतो की, "नियामक मंडळातील मान्य ठरावांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महामंडळ स्तरावर तपासून महामंडळाच्या स्वयंस्पष्ट अभिप्राय व करावयाच्या कार्यवाहीचा निश्चित कालावधी देण्याच्या अटीवर नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.३- सदरचा ठराव अमान्य करण्यात आला.

ठराव क्र.४७.४- ठराव करण्यात येतो की, "वाघुर प्रकल्पांतर्गत मौजे हिवरखेडा, ता.जामनेर या प्रकल्पबाधीत गावातील गट क्र-१८६/१ मधील संयुक्त मोजणी पत्रकात दर्शविलेल्या तथापी प्रत्यक्ष नुकसान भरपाई अदा न केलेल्या विहिरींच्या संपादन प्रस्तावानुसार रु.३.०९ लक्ष मोबदला देण्याच्या प्रस्तावास संबंधीत जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय घेऊन संबंधीत शेतकऱ्यास अदा करण्यास तसेच अशा स्वरुपाचे प्रस्ताव संबंधीत जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय घेऊनच सादर करावे या अटीसह नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.५- ठराव करण्यात येतो की, "प्रकाशा बुराई उ.सिं.योजना, ता.जि.नंदुरबार योजनेच्या उर्ध्वगामी नलीका (Raising Main) तसेच पंप हाऊससाठी ३८.३३ हेक्टर क्षेत्र खाजगी वाटाघाटीने सरळ खरेदी करणेचा प्रस्ताव असून त्यासाठी प्रचलित शीघ्रगणकाच्या दराप्रमाणे (रु.२.६० लक्ष प्रति हेक्टर) एकुण अंदाजित किंमत रु.३.०८ कोटी खर्च प्रकल्पासाठीच्या उपलब्ध अनुदानातून करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.६- ठराव करण्यात येतो की, "प्रकाशा बुराई उ.सिं.योजना, ता.जि.नंदुरबार योजनेच्या जॅक वेल, इनटेक पाईप तसेच पंप हाऊससाठी ०.५१ हेक्टर क्षेत्र खाजगी वाटाघाटीने सरळ खरेदी करणेचा प्रस्ताव असून त्यासाठी प्रचलित शीघ्रगणकाच्या दराप्रमाणे (रु.२.६० लक्ष प्रति हेक्टर) एकूण अंदाजित किंमत रु.४.७० लक्ष खर्च प्रकल्पासाठीच्या उपलब्ध अनुदानातून करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

[प्र.रा.भामरे]
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

[सुनिल तटकरे]
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

ठराव क्र.४७.७- ठराव करण्यात येतो की, "नियोजित देवनाचा साठवण तलावाचे सर्वेक्षणाचे काम महामंडळांतर्गत उपलब्ध आस्थापनेकडून करुन घेण्यात यावे व अन्वेषणाचे काम (बोअरींग इ.) यांत्रिकी विभागाच्या कार्यक्रमात समाविष्ट करुन हाती घेण्यात यावे या दुरुस्तीसह सदर प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.८- ठराव करण्यात येतो की, "निम्न तापी प्रकल्प पाडळसे, ता.अमळनेर पाडळसे गावठाण हद्दीतील संपादित होणाऱ्या अतिक्रमित २२ बाधितांच्या घरांचे जास्तीत जास्त रु.१ लक्ष प्रति घराप्रमाणे सानुग्रह अनुदान रु.२२ लक्ष संबंधीत जिल्हाधिकारी यांच्या संमतीनंतर अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.९- ठराव करण्यात येतो की, "निम्न पांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्प ता.साक्री, जि.धुळे अंतर्गत डावा कालवा किमी १ मधील कंड्यूटच्या बांधकामाच्या निविदेंतर्गत कामाच्या व्याप्तीत बदल होत असल्याने चालू असलेल्या निविदांच्या बाबींवर १२५% पर्यंतची परिमाणे विचारात घेऊन उर्वरीत परिमाणासाठी नविन निविदा मागविण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

ठराव क्र.४७.१०- ठराव करण्यात येतो की, " जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदीवर वरखेडे लोंढे बॅरेज ते तापी नदीपर्यंत पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या एकूण ७ बंधाऱ्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सर्वेक्षणाचे काम उपलब्ध आस्थापनेकडून व भूशास्त्रीय अन्वेषणाचे काम यांत्रिकी विभागामार्फत करण्यात यावे या दुरुस्तीसह प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.११- ठराव करण्यात येतो की, "महामंडळाचे नॉन-ऑपरेटिव्ह खाते क्र- २००२४९०३६०८ मधून रक्कम रु.३४०३८४९/- व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जळगाव यांचे बँक खाते क्र- २००२४९०३६६४ मधून रु.४७९४९५८४/- भूसंपादन न्यायालयीन प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालय, जळगाव यांचे आदेशानुसार बँकेतून परस्पर न्यायालयात जमा करण्यात आलेल्या रकमा महामंडळाच्या नॉन-ऑपरेटिव्ह खात्यातील रकमेतून समायोजित करण्यास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

| | |
|---|---|
| [प्र.रा.भामरे] | [सुनिल तटकरे] |
| कार्यकारी संचालक व सदस्य सचिव | मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |

**ठराव क्र.४७.१२-** **ठराव करण्यात येतो की, "ओढरे ल.पा.तलाव, ता.चाळीसगाव, जि.जळगाव प्रकल्पासाठी मौजे ओढरे व विष्णूनगर भूसंपादन प्रस्ताव क्र-१/२००७ मधील निवाड्यात समाविष्ट नसलेल्या (सरकारी जागेवर बांधलेल्या) घरकुलाची रक्कम रु.१०.४७ लक्ष सानुग्रह अनुदान म्हणून संबंधीत जिल्हाधिकारी यांचे संमतीने व त्यांचेमार्फत अदा करण्याच्या दुरुस्तीसह नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र.४७.१३-** **ठराव करण्यात येतो की, "वाघुर धरणाचे जलाशय व परिसराचा पर्यटन क्षेत्र म्हणून खाजगी विकासकाकडून बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकास करण्यासाठी जाहिर निविदा काढून आवश्यक ती कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**विषय क्र.४८.२- नियामक मंडळातील मान्य ठरावाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत (Action taken report) नियामक मंडळास अवगत करणेबाबत.**

नियामक मंडळाच्या ४७व्या बैठकीतील मान्य ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यकारी संचालक यांनी नियामक मंडळास अवगत केला यावर चर्चा होऊन सर्वानुमते ठराव पारित करण्यात आला.

**विषय क्र.४८.३- पुनंद मोठ्या प्रकल्पांतर्गत सुपळे डावा कालवा किमी १ ते ३ मध्ये पारंपारीक कालव्या ऐवजी बंदिस्त पाईप लाईनद्वारे पाणी नेण्याच्या प्रस्तावास व त्यासाठी येणाऱ्या रु.३५४.९० लक्ष खर्चाच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता मिळणेबाबत.**

प्रथम कार्यकारी संचालक यांनी पुनंद प्रकल्पाबाबतची सद्यस्थिती नियामक मंडळास अवगत केली. कालव्याच्या कामाची निविदा मे.एम.एस.कन्स्ट्रोटेक प्रा.लि., जळगाव यांना माहे १२/२०१२ मध्ये देण्यात आली आहे.

मंजूर संरेखानुसार ठेकेदार यांनी प्रत्यक्ष कामास सुरुवात केली त्यावेळी कालव्याच्या सुरुवातीस कि.मी. १ ते ३ मधील शेतकऱ्यांनी विरोध केल्यामुळे काम होऊ शकले नाही. त्यामुळे कि.मी. ४ पासून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली सद्यस्थितीत कि.मी. ४ ते ७ पर्यंत काम प्रगतीत आहे.

सुपळे डावा कालव्याचे कामास १५.११ हेक्टर खाजगी जमिन आवश्यक असून, त्यापैकी

"मान्य"

| | |
|---|---|
| **[प्र.रा.भामरे]** | **[सुनिल तटकरे]** |
| कार्यकारी संचालक व सदस्य सचिव | मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |

कि.मी. ४ ते ९ मधील ८.५२ हे. जमिन संपादित झाली आहे. कालव्याचे कि.मी. १ ते ३ वगळता इतर लांबीतील भूसंपादन प्रस्तावाची महसुल यंत्रणेकडून संयुक्त मोजणी झाली असून कलम ४ वर आहे. कि.मी. ७ ते ९ मधील भुसंपादन ५२-अ महसुल प्रक्रियेवर आहे.

कि.मी. १ ते ३ मध्ये सुपळे दिगर गावाचे १० भूधारक व काठरेदिगर गावाचे २२ भूधारक असून पारंपारीक कालव्यासाठी अनुक्रमे २.१९ व ४.४० हेक्टर जमिन लागते. सदर जमिन कालवासाठी घेतल्यास ५०% भुधारक अल्पभुधारक होत आहे.

कालव्याचे कि.मी. १ ते ३ मध्ये सुपळे दिगर व काठरेदिगर या गावाचे क्षेत्र येते. या गावातील लोकांची शेतजमिन यापुर्वीच सुपळे धरणाचे कामासाठी वापरली आहे. तसेच उर्वरीत शेतजमिन ही कालव्याचे कामासाठी वापरल्याने ते अल्पभुधारक होत आहे. त्यामुळे ते कालव्याचे कामासाठी जमिन देण्यास तयार नाही. तथापि जमिनीखाली पाईपलाईन कालवा देण्यास त्यांची संमती आहे व तसा ठराव ग्रामपंचायत सुपळे दिगर व काठरेदिगर, ता. कळवण, जि.नाशिक यांनी दिनांक २/१०/२०१३ अन्वये केला आहे असे कार्यकारी संचालक यांनी विषद केले.

जमिनीखाली १२०० मी.मी. व्यासाचे NP २ पाईप मधून कालवा प्रवाहित करणे व संधानक मंजूषा बांधकाम (RCC Channel) करणे याबाबतचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१२-१३ च्या दरसुचीनुसार तुलनात्मक अभ्यासाचा खालीलप्रमाणे तपशिल नियामक मंडळास अवगत केला.

| | |
|---|---|
| अ) निविदेनुसार कालवा बांधकाम | - रु.३६५.१२ लक्ष |
| ब) जमिनीखालुन १२ मी मी. व्यासाचे NP २ पाईप | - रु.३५४.९० लक्ष |
| क) संधानक मंजूषा (RCC Channel) | - रु.४९८.६४ लक्ष |

निविदेत समाविष्ठ पारंपारीक कालव्यासाठी सुमारे २० मीटर रुंदीसाठी ६.३७ हेक्टर खाजगी जमिनीचे संपादन करावे लागते. तर पाईप व संधानक मंजुषासाठी अनुक्रमे ०.०७९ व १.२७ हेक्टर संपादन करावी लागणार आहे. पाईपलाईन व संधानक मंजुषाद्वारे कालवा प्रस्तावीत केल्यास ५ बांधकामे (Structures) करण्याची आवश्यकता उरत नाही.

बंदिस्त पाईपलाईनद्वारे कालव्याच्या कामात रु.१०.२२ लक्ष बचत होणार आहे. पाईपलाईन करण्यासाठी निविदेत खोदाई पाईप टाकणे/बसविणे या बाबी समाविष्ठ आहे. तथापि सदर कामामुळे

"मान्य"

[प्र.रा.भामरे]
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

[सुनिल तटकरे]
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

त्यांचे परिमाण १२५% पेक्षा जास्त होणार असल्याने नविन निविदा काढून सदर काम करण्याचा प्रस्ताव आहे.

सदर कालव्याचे काम केंद्र शासनाच्या वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमाअंतर्गत (एआयबीपी) प्राप्त अर्थसहाय्यातून प्रगतीत आहे. तसेच कालव्यावर १६० हेक्टर सिंचन क्षमता निर्मित करणे प्रस्तावित आहे. प्रकल्पाचे काम मार्च-२०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यावर पारंपारिक पद्धतीने कालवा व पाईपमधून कालवा प्रवाही करणे यावर तांत्रिक अभ्यास करुन सदर कामाचे benefit cost analysis करणे आवश्यक असल्याचे नियामक मंडळाने सांगितले. सदर प्रकरणी भूसंपादनाच्या किंमतीत घट होऊन RCC pipe ने कालवा प्रवाही करण्याच्या बांधकाम किंमतीत वाढ होईल. तसेच उर्वरीत क्षेत्रातील शेतकरी अशा प्रकारची मागणी करणार नाहीत याबाबत दक्षता घेण्याचे नियामक मंडळाने सांगितले. यावर उर्वरीत क्षेत्रात कालव्याचे मातीकाम व बांधकाम पूर्ण झाले असल्याने अशाप्रकारची मागणी येणार नाही असे कार्यकारी संचालक यांनी नियामक मंडळास सांगितले. चर्चेअंती सदरचा विषय सर्वानुमते पारित करण्यात आला.

**विषय क्र.४८.४ - बोरखेडा सांगवी ल.पा.योजना, ता.यावल, जि.जळगाव या योजनेच्या प्रस्तावित वितरीका क्र-१ व २ करण्यास व त्यासाठी आवश्यक जमिन देण्यास शेतकऱ्यांचा प्रखर विरोध असल्याने सदर वितरीका क्र-१ व २ वगळण्यास नियामक मंडळाची मान्यता मिळणेबाबत.**

सदर विषयाच्या चर्चेत कार्यकारी संचालक यांनी बोरखेडा सांगवी ल.पा.योजना, ता.यावल, जि.जळगाव या योजनेची प्रशासकीय मान्यता व कामाची सद्यस्थिती याबाबत नियामक मंडळास अवगत केले. सदर योजनेंतर्गत प्रस्तावित वितरीका क्र-१ व २ ची लांबी प्रत्येकी ३ किमी असून त्यासाठी अंदाजे १० हेक्टर भूसंपादन करावे लागणार आहे. तथापी लाभक्षेत्रात अत्यंत सुपिक व उच्च प्रतीच्या जमिनी असल्याने त्या वितरीकांसाठी देण्यास शेतकऱ्यांचा प्रखर विरोध आहे व सदर वितरीका क्र- १ व २ ला लागणाऱ्या जमिनी संपादित करण्यास शेतमालकांचा प्रखर विरोध असून सदर वितरीका करु नये असा ठराव ग्रामपंचायतीने केला आहे. त्यानुसार बोरखडा सांगवी ल.पा.योजनेच्या वितरीका क्र-१ व २ वगळण्याचा प्रस्ताव आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन चर्चेअंती सदरचा ठराव पारित करण्यात आला.

"मान्य"

| | |
|---|---|
| [प्र.रा.भामरे] | [सुनिल तटकरे] |
| कार्यकारी संचालक व सदस्य सचिव | मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |

**विषय क्र.४८.५ - ता.चाळीसगांव जि.जळगाव येथील दरेगांव लघु पाटबंधारे प्रकल्प रद्द करणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देणेबाबत.**

सदर विषयाच्या चर्चेत कार्यकारी संचालक यांनी दरेगांव प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यता, पाणीसाठा व सिंचन क्षमता या विषयी नियामक मंडळास अवगत केले. सदर प्रकल्पासाठी १४.५३ हेक्टर वनजमिन आवश्यक आहे. प्रकल्पाच्या कामासाठी रु.१६६.२३ लक्ष खर्चाची "क" निविदा बोलविली होती. तथापि, "प्रकल्पाचे लाभ धारकांना भरपूर पाणी मिळते, बुडित क्षेत्रात चांगली जमिन बुडते त्यामुळे प्रकल्प करु नये," याबाबत माहे ६/२००१ मध्ये अर्ज देवुन सदर काम करण्यास विरोध केला. त्यानुसार सदर प्रकल्पासाठीची भुसंपादन प्रक्रिया तातडीने थांबविणे विषयी जिल्हाधिकारी, जळगाव यांना कळविण्यात आले होते असे कार्यकारी संचालक यांनी नियामक मंडळास अवगत केले.

सदर योजनेच्या बुडीत क्षेत्रात व धरण रेषेतील काही शेतकऱ्यांनी गिरणा नदीतून पाईप लाईनद्वारे पाणी आणून जमिनी बागायती केलेल्या असून सध्या यात ऊस, केळी, फळझाडे आहे. त्यामुळे बागायत क्षेत्राचा मोबदला देणे ही खुपच खर्चिक बाब ठरणार आहे. तसेच परिसरात यापुर्वी कृष्णापुरी ल.पा. तलावाचे काम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे परिसरातील काही शेतकऱ्यांनी तेथून पाणी आणून बागायती जमिनी केलेल्या आहे. तसेच या प्रकल्पाचे शेजारी गिरणा नदीवर वरखेडे बॅरेजचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत नियोजन संपुर्ण लाभधारकांनी गिरणा नदीवरुन उपसा सिंचनाद्वारे बागायाती केलेली आहेत. दरेगांव लघु पाटबंधारे तलावातील लाभधारकांना आज रोजी एकही गटास सिंचनाची आवश्यकता नाही. यामुळे सदर प्रकल्प रद्द करणे उचित होईल, तसेच ग्रामपंचायत वरखेडे बु., ता.चाळीसंगाव जि.जळगाव यांनी प्रकल्प रद्द करणे विषयी लेखी ठराव दिलेला आहे. सद्यस्थितीत मार्च-२०१४ अखेर प्रकल्पावर रु.६७.०० लक्ष खर्च झाला असून २०१४-१५ च्या वार्षिक आखणीत रु.१.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे.

तथापी लाभधारक शेतकऱ्यांना प्रकल्पाची आवश्यकता नसल्याने सदरचा प्रकल्प रद्द करण्याचा प्रस्ताव नियामक मंडळास सादर करण्यात येत आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन लाभधारकांना सदर प्रकल्पाची आवश्यकता नसल्याने सदर प्रकल्प रद्द करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात आली व त्यानुसार प्रस्तावित ठराव मान्य करण्यात आला.

"मान्य"

[प्र.रा.भोमरे]
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

[सुनिल तटकरे]
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

**विषय क्र.४८.६ - निम्न तापी प्रकल्पाचे सांडवा बांधकामात २२ मी.मी. व त्यापेक्षा मोठ्या आकाराचे लोखंड 'जिंदाल' कंपनीचे वापरण्यास स्विकृत निविदेतील अटी/शर्ती व लोखंडासंबंधी चाचणीच्या विनिर्देशांच्या (Sepecifications) अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता मिळणेबाबत.**

सदर विषयाच्या चर्चेत कार्यकारी संचालक यांनी निम्न तापी प्रकल्पासाठी वापरण्यात येणाऱ्या लोखंडाविषयी अवगत केले. तसेच स्विकृत निविदेतील तरतूदी व्यतिरिक्त जिंदाल कंपनीचे स्टील वापरण्याबाबत मान्यता देण्याविषयी नियामक मंडळास विनंती केली. यावर चर्चा होऊन सदरची बाब तांत्रिक असल्यामुळे नियामक मंडळाच्या कार्यकक्षेत येत नसल्याचे नियामक मंडळाने सांगितले. स्विकृत निविदेतील specifications व IS code मधील तरतूदीनुसार वापरावयाच्या स्टीलबाबत आवश्यक त्या विविध चाचण्या घेऊन शासनास प्रस्ताव सादर करावा असे नियामक मंडळाने सूचित केले. त्यानुसार कार्यकारी संचालक यांनी प्रस्तावित ठराव मागे घेतला.

**विषय क्र.४८.७ - हतनूर धरणाच्या बुडीत क्षेत्रातील मौजे धामंदे, ता.मुक्ताईनगर येथील ७१ घरांचे संपादन होवून पुनर्वसन करणे व त्यासाठी येणाऱ्या रु.६.८१ कोटी खर्चाच्या प्रस्तावास शासनाची मदत व पुनर्वसन विभागाची मान्यता मिळण्याबाबत शासनास शिफारस करण्यास नियामक मंडळाची मान्यता मिळणेबाबत.**

सदर विषयाच्या चर्चेत कार्यकारी संचालक यांनी हतनूर प्रकल्पाचे काम सन-१९७१ मध्ये सुरु झाले. सदर प्रकल्पाचे मुळ मंजूर प्रकल्प अहवालानुसार रावेर व मुक्ताईनगर तालुक्यातील हतनूर धरणात बुडणाऱ्या १८ गावांचे पुनर्वसन प्रस्तावित होते. त्यात मुळ प्रकल्प अहवालाप्रमाणे धामंदे ता.मुक्ताईनगर येथील घरांचे संपादन नाही.

हतनूर प्रकल्पाचे काम सुरु असतांना सन १९७८ मध्ये तापी नदीस महापूर आला, त्यावेळी पुरामुळे धामंदे गावातील घरे बाधीत झाली. महापुरात प्रस्तावित क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्रात पुराचे पाणी गेले व त्यामुळे जादा गांवे बाधीत झाली होती. त्यामुळे पुराचा अभ्यास करणेसाठी धरणाच्या सुरक्षिततेसाठी तसेच जमीन संपादन व घरांचे पुनर्वसन संबंधी उपाययोजना सुचविणेसाठी शासनाने गोळे समितीची नेमणूक केली. सदर समितीने केलेल्या शिफारशी शासनाने पत्र क्र- युटीपी

"मान्य"

[प्र.रा.भामरे]
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

[सुनिल तटकरे]
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

१०७८/(३१२१)/एमएजे-३, दिनांक २५/२/१९८० नुसार स्विकृत केल्या आहेत. स्विकृत केलेल्या शिफारशी नुसार २५ वर्षातून एकदा येणाऱ्या पूररेषेच्या पातळी पर्यंत वा या पूररेषेने वेढल्या जाणाऱ्या घरांचे संपादन करुन त्यांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित होते.

मौजे धामंदे ता. मुक्ताईनगर हे गांव तापी नदीच्या डाव्या तिरावर हतनूर धरणाच्या वरच्या बाजूस साधारण ३४.०० कि.मी. अंतरावर बसलेले आहे. धामंदे हे संपूर्ण गांव २५ वर्षातून एकदा येणाऱ्या पूररेषेच्या म्हणजेच तलांक २२३.३० मी च्या वर तलांक २२४.२१५ मी. वर आहे. गांवाची पातळी २२५मी. ते २२७ मी. या दरम्यान आहे. या गावातील काही घरे तापी नदीलगतचे काठावर उंच कड्यावर नदीच्या कडेपासून अंत्यत जवळ असल्याने व कडा वांरवार ढासळत असल्यामुळे काही घरांचे दुसरीकडे पुनर्वसन करण्याची शिफारस गोळे अहवालात दिसून येते. धामंदे गांव हे कोणत्याच निकषा मध्ये येत नसले तरी गोळे समितीच्या शिफारशीन्वये मुख्य अभियंता पाटबंधारे विभाग उत्तर महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाचे पत्र क्र-आ-४/उध्र्व तापी/पुनर्वसन/ ४८३७, दिनांक १६/९/१९८५ अन्वये हतनूर जलाशयाच्या कक्षेत येणाऱ्या मौजे धामंदे येथील नदी कडेपासून १० मी. अंतरामधील घरे संपादन करण्याचे मान्यता होती त्यानुसार भुसंपादन प्रस्ताव ७/९० अन्वये ५७ बांधीतांची घरांचे संपादन करण्यात आलेले आहे. त्यासाठी घरे संपादन प्रस्ताव क्रमांक ७/९० च्या लाभधारकांसाठी पुनर्वसन मंजूर अभिन्यासात अंतर्गत रस्ते, मोऱ्या, पाणी पुरवठासाठी वितरण प्रणालीची कामे पूर्ण झाली आहे.

मात्र मौजे धामंदे ता. मुक्ताईनगर येथील तापी नदीच्या उंच कड्यांची झिज होत असल्याने ७१ घरांचे पुनर्वसन करण्याबाबत संबंधीत ग्रामस्थ व लोक प्रतिनिधी यांचे कडून सन १९९५ पासून सारखी मागणी होत आहे. धामंदे ता.मुक्ताईनगर गावाचे पुनर्वसनाबाबत सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रस्ताव क्रमांक | प्रस्तावाचे प्रयोजन | संपादीत घरांची संख्या | अंतिम निवाडा, स्थिती व रक्कम | नागरी सुविधा स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | गोळे समिती प्रस्ताव (कडेवरील घरे संपादन ) | कडे पासुन १० मी. अंतरावरील घरे संपादनाचे आदेश प्रस्ताव क्र. ७/९० | सन १९८५ ५७ घरे | भुसंपादन प्रस्ताव ७/९० नुसार अंतिम निवाडा रक्कम संबंधितांना अदा करण्यांत आली आहे. | प्लॉट वाटप पुर्ण, नागरी सुविधा कामे अंतर्गत रस्ते, मोऱ्या, पाणी पुरवठासाठी वितरण प्रणालीची कामे पुर्ण केलेली आहे. |

दिनांक २६/०१/२०१४ रोजी मौजे धामंदे, ता.मुक्ताईनगर येथील सरपंच व ईतर ग्रामस्थांनी ७१

"मान्य"

[प्र.रा.भामरे]
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

[सुनिल तटकरे]
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

बाधीत घरे संपादन करण्याबाबत निवेदन दिलेले आहे व त्यात बेमुदत उपोषण करण्याबाबत तहसीलदार, मुक्ताईनगर यांना निवेदन दिलेले आहे.

सरपंच ग्रामपंचायत धामंदे ता. मुक्ताईनगर यांचे वेळोवेळी विविध स्तरावर तक्रारदार यांचे अर्जा सोबत दिलेल्या ठरावानुसार काही घरे तापी नदीच्या १९९८ मध्ये आलेल्या महापूरामुळे कडा ढासळल्यामुळे काठावरील घरांमध्ये धोकादायक स्थितीत राहत आहेत. त्यांचे पुनर्वसन होणे आवश्यक असल्याची मागणी होती.

प्रस्तावित केलेल्या ७१ घरांची धोकादायक परिस्थिती पूर्वी नव्हती. परंतू सन १९९९ ते २०१० पर्यंतच्या कालखंडात खासकरुन सन २००६ मध्ये ६ ऑगष्ट ते ८ ऑगष्ट दरम्यान आलेल्या तापी, पूर्णा नदीच्या महापूरामुळे तापी नदीच्या कडांची धूप होऊन तापी नदींच्या उंच कडयांची पडझड झाली.

तापी नदी धामंदे गावाजवळ वळते ती महापूराच्या वेळी हतनूर धरणाच्या फुगवटा तयार होऊन कडा ढासळतात त्यामुंळे कडेनजिकच्या वस्तिला दिवसेंदिवस धोका वाढत आहे. सदर नदीचा कडा ठिसूळ मातीच्या वाळू मिश्रीत गाळाने बनलेला असून तापी नदीच्या पाण्याच्या संपर्कामुळे कडा ढासळतात.

**मा.ना.एकनाथराव खडसे, विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधान सभा यांनी दि. ५/१०/२०१३ रोजी हातनुर धरणाच्या जलाशयामुळे बाधीत होत असलेल्या मुक्ताईनगर व रावेर तालुक्यातील जिल्हा जळगाव राहती घरे संपादन करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना पत्र दिले आहे. त्या पत्रामध्ये मौजे धामंदे या गावाचा उल्लेख आहे. मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी खास बाब म्हणून प्रस्तावीत करावे असे आदेशित केले आहे.**

विभागीय आयुक्त नाशिक, विभाग नाशिक यांचे मार्फत ७१ घरांची कार्यकारी यंत्रणेने पाहाणी करुन विशेषबाब अंतर्गत पुनर्वसन करणे बाबतचा नियमानुसार केलेला प्रस्ताव मंजुरी मिळने कामी. मा.अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन महसुल व वनविभाग मंत्रालय मुंबई-३२) दिनांक १४/१२/२००९ या अन्वये मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

वेळोवेळीच्या संयुक्त पाहाणी अहवालानुसार सन १९९५ ते २०१० पर्यंतच्या कालखंडात विशेष करुन सन २००६ मध्ये ६ ऑगस्ट ते ८ ऑगस्ट दरम्यान आलेल्या तापी पुर्णा नदीच्या महापुरामुळे तापी

"मान्य"

[प्र.रा.भामरे]
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

[सुनिल तटकरे]
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

नदीच्या कडांची धुप होऊन उंच कडांची पडझड झाल्याने रहीवाश्यांना असुरक्षीत वाटते. धामंदे गावाजवळ तापी नदीचे पात्रा मध्ये नदीकडील भागातील तट मातीचा रेती मिश्रीत असल्याने पुराच्यावेळेस मोठ्या प्रमाणात कडा कोसळल्याचे दिसुन येते. त्यामुळे जुन्या गावठानातील घरीजवळील जागा अंदाजे इशान्य कडे १०० मी. पर्यंत व दक्षिणे कडे अंदाजे ५० मी. पर्यंत कडा कोसळलेल्या आहेत. त्यामुळे नदीच्या काठावरील वस्तीला दिवसेंदिवस धोका वाढत आहे. तापी नदीच्या कडा ठिसुळ मातीच्या व वाळु मिश्रीत गाळाने बनलेल्या असुन तापी नदीच्या पाण्याच्या संपर्कामुळे गावातील नदीकडे जाणारे रस्ते बंद झाले आहेत. त्यामुळे गावकऱ्यांना जिवन असुरक्षीत वाटते.

कायम स्वरुपी मार्ग निघण्यासाठी धोकादायक ७१ घरे हलविने आवश्यक आहे. मैजे धामंदे ता.मुक्ताईनर, जि.जळगाव येथील तापी नदीच्या उंच कडा नजिकची धोकादायक ७१ घरे संपादनासाठी व पुनर्वसनासाठी लागणारा अंदाजित खर्च पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रयोजन | अंदाजीत रक्कम (कोटी ) |
|---|---|---|
| १. | ७१ घरें संपादनासाठी मुल्यांकन रक्कम | ४.८१ |
| २. | पुनर्वसनासाठी लागणाऱ्या जमिनाची किंमत | १.०० |
| ३. | आवश्यक नागरी सुविधा, पाणी पुरवठा अंतर्गत रस्ते, विजपुरवठा, बांधीव गटारे | १.०० |
| | **एकुण** | **६.८१** |

त्यानुषंगाने चर्चेअंती सदर प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात आली.

**विषय क्र.४८.८-** **लोक सहभागातून पांझरा नदीवर कमी उंचीचे ३ बंधारे बांधण्यासाठी "मी धुळेकर" या सामाजिक संस्थेच्या विनंती अर्जानुसार धुळे शहर सुशोभीकरण करण्यासाठी (२ मी. उंचीचे व १ दलघफू क्षमतेच्या आतील) सिंचन व्यवस्थापन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याच्या अटीवर बांधण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता मिळणेबाबत.**

सदर विषयाच्या चर्चेत कार्यकारी संचालक यांनी पांझरा नदीवर कमी उंचीचे तीन बंधारे लोकसहभागातून बांधण्याचा प्रस्ताव "मी धुळेकर या सामाजिक संस्थेने समाज सेवेच्या दृष्टीने सादर

"मान्य"

[प्र.रा.भामरे]
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

[सुनिल तटकरे]
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

केला असल्याचे नियामक मंडळास अवगत केले. सदर बंधारे धुळे नगर सुशोभिकरण अंतर्गत येत असल्याने व बंधाऱ्यांची उंची दोन मिटरच्या आत व साठवण क्षमता १ दलघफू च्या आत असल्याचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले. सदर लहान उंचीचे बंधारे बांधल्यानंतर भूजलपातळी वाढण्यासाठी मदत होणार आहे तसेच सदर बंधाऱ्यांचा खर्च व पुढील निगराणीचे काम "मी धुळेकर" ही सामाजिक संस्था करणार असल्याने महामंडळावर खर्चाची जबाबदारी राहणार नाही असेही कार्यकारी संचालक यांनी नियामक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले. यावर सविस्तर चर्चा झाली. सदर बंधाऱ्यांची साठवण क्षमता ५ दलघफू पेक्षा कमी असल्यामुळे यासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले. त्यावर पांझरा नदीत flood afflux (पूराचा फुगवटा) होणार नाही किंवा river cross section मध्ये बदल होणार नाही. दृढीकरण करुन पूर्व व्यवहार्यता अहवाल (Pre Fisibility Report) तपासण्यात यावा या अटीवर या अटीवर व त्यानुसार सर्वानुमते सदरचा ठराव पारित करण्यात आला.

**विषय क्र.४८.९-** **जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदीवर वरखेडे लोंढे बॅरेज ते तापी नदीपर्यंत, पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या एकूण ७ बंधाऱ्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सर्वेक्षण व भूशास्त्रीय अन्वेषणाचे काम मा.पालकमंत्री, जळगाव जिल्हा यांच्या सुचनेनूसार खाजगी अभिकरणामार्फत करण्याच्या प्रस्तावाचा फेरविचार करण्यास नियामक मंडळाची मान्यता मिळणेबाबत.**

जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदीवर वरखेडे लोंढे बॅरेज ते तापी नदीपर्यंत, पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या एकूण ७ बंधाऱ्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सर्वेक्षण व भूशास्त्रीय अन्वेषणाचे काम खाजगी अभिकरणामार्फत करण्याचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या ४७व्या बैठकीत विषयक क्र-४७.१० अन्वये सादर केला होता. त्यावर पूर्व व्यवहार्यता अहवाल (Pre Fisibility Report) व्यवहार्य असल्यास सर्वेक्षणाचे काम उपलब्ध आस्थापनेकडून व अन्वेषणाचे काम यांत्रिकी विभागामार्फत करण्यात यावे असे निर्देश नियामक मंडळाने दिलेत. तथापी सदरचे काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक असल्याने मा.पालकमंत्री, जळगाव जिल्हा यांनी सदर सर्वेक्षणाचे काम

"मान्य"

**[प्र.रा.भामरे]**
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

**[सुनिल तटकरे]**
मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

खाजगी अभिकरणामार्फत करण्यात यावे असे सुचित केले आहे असे कार्यकारी संचालक यांनी नियामक मंडळास सांगितले. सदर कामाची किंमत एकूण रु.१६४ लक्ष इतकी असून बंधाऱ्यांचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण खाजगी अभिकरणामार्फत करण्यास मान्यता मिळावी अशी विनंती नियामक मंडळास करण्यात आली.

सदरच्या विषयावर मागील नियामक मंडळाच्या बैठकीत मा.पालकमंत्री, जळगाव जिल्हा यांच्या मागणीनुसार सदरचा विषय नियामक मंडळापुढे फेरचर्चेसाठी ठेवला यावर नियामक मंडळाने नाराजी व्यक्त केली.

यावर पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर सर्वेक्षणाची कामे उपलब्ध आस्थापनेकडून होऊ शकत नसल्याबाबत संबंधीत मंडळ/विभागाकडून दृढीकरण घेण्यात यावे. तसेच बोअर घेण्याचे काम यांत्रिकी विभागाकडून करु शकते किंवा कसे, याबाबत त्यांचा अहवाल घेण्यात यावा. बोअरिंगचे काम यांत्रिकी विभाग करु शकत नसल्यास सदरचे काम खाजगी अभिकरणामार्फत करण्यास हरकत नाही असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. चर्चेअंती ठरावात आवश्यक दुरुस्ती करुन दुरुस्तीसह ठरावास नियामक मंडळाने सशर्त मान्यता दिली.

**विषय क्र.४८.१० - मौजे तांदलवाडी, ता.रावेर, जि.जळगाव येथील हतनूर प्रकल्पाचे जलाशयामुळे बाधीत होणाऱ्या अतिक्रमित घरांचे संपादनाचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या शिफारसीसह शासनास सादर करणेस नियामक मंडळाची मान्यता मिळणेबाबत.**

सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा झाली. सदरचा विषय यापूर्वी नियामक मंडळाच्या दिनांक ९/२/२०१० रोजीच्या ३५व्या बैठकीत ठेवण्यात आला होता त्यावर चर्चा होऊन ठराव क्र-३५.१४ **"मौजे तांदलवाडी, ता.रावेर, जि.जळगाव येथील अतिक्रमित घरांचा मोबदला देता येणार नाही असा ठराव पारित झालेला आहे."**

सदर घरांच्या अतिक्रमीत बांधकामाचे मूल्यांकन सार्वजनीक बांधकाम विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार सुमारे रु.१८,५७,६२५/- एवढे येते. रिट पिटीशन क्र ३११६/२००९ च्या नुसार

"मान्य"

| | |
|---|---|
| [प्र.रा.भामरे] | [सुनिल तटकरे] |
| कार्यकारी संचालक व सदस्य सचिव | मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |

श्री.मधूकर राजाराम महाजन व इतर यांनी उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात अतिक्रमीत घरांच्या संपादनाबाबतीत मागणी केलेली होती. त्यानुसार खंडपीठाने दिनांक ३१/७/२००९ रोजी निर्णय देवून अर्जदारास दोन महिन्याचे आत त्याचे दिनांक ५/५/२००८ पत्रास उत्तर देण्याविषयी आदेश केले होते. सदर आदेश रजिष्ट्रार मार्फत दिनांक १२/८/२००९ नंतर प्राप्त झाले. नंतर अर्जदाराने दिनांक २१/१०/२००९ रोजी मुख्य सचिव, पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई (२) महसूल आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक जेलरोड, नवीन महसूल बिल्डींग, २रा मजला, नाशिक (३) जिल्हाधिकारी, जळगाव (४) मॅनेजिंग डायरेक्टर, तापी पाटबंधारे कॉर्पोरेशन, जळगाव यांना नोटीस दिली होती. त्यावर सदर नोटीसीस अर्जदारास वकिलाद्वारे उत्तर दिलेले आहे असे कार्यकारी संचालक यांनी नियामक मंडळास विषद केले. या बाबी विचारात घेता सविस्तर चर्चेनंतर कार्यकारी संचालक यांनी प्रस्तावित ठराव मागे घेतला.

**आयत्या वेळेचे विषय-**

**विषय क्र.४८.११-** **माणिकपुंज मध्यम प्रकल्प, ता.नांदगाव, जि.नाशिक धरणस्थळी संपादन केलेल्या जागेत नांदगाव शहर पाणी पुरवठा योजनेच्या switch room व इतर बांधकामासाठी ६०.७४ चौमी जागा नगर परिषद, नांदगाव यांचेकडून आवश्यक मोबदला घेऊन हस्तांतर करण्यास नियामक मंडळाची मान्यता मिळणेबाबत.**

सदर विषयाच्या चर्चेत कार्यकारी संचालक यांनी माणिकपुंज मध्यम प्रकल्पाच्या कामाबाबत नियामक मंडळास अवगत केले. सदर प्रकल्पात १००% पाणीसाठा निर्माण झाला असून जलाशयातून जिल्हाधिकारी, नाशिक यांनी त्यांच्या प्रासंगिक आरक्षणातून नांदगाव नगर परिषदेसाठी ७० दलघफू पाणी पिण्यासाठी आरक्षीत केले असून सन २०१२-१३ पासून पाणी पूरविण्यात येत असल्याचे सांगितले. सदर पिण्याच्या पाण्यासाठी पाणीपट्टीची वसूली नियमितपणे करण्यात आली असून नांदगाव नगर परिषदेकडे कोणतीही थकबाकी नाही. पाणी पुरवठ्यासाठी आवश्यक असणारा विद्युत पुरवठा नियमित, सुरळीत व संरक्षित असावा यासाठी १ विद्युत यंत्र व switch room बांधण्याचे नगर पालिकेने प्रस्तावित केले असून सदर कामासाठी माणिकपुंज धरण स्थळाजवळ ६०.७७ चौमी इतक्या जागेची आवश्यकता असल्याचे नगर परिषद, नांदगाव यांनी महामंडळास कळविले आहे. त्याचप्रमाणे

"मान्य"

| | |
|---|---|
| [प्र.रा.भामरे] | [सुनिल तटकरे] |
| कार्यकारी संचालक व सदस्य सचिव | मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |

सदर जागेची किंमत प्रचलित कार्यपद्धतीनुसार महामंडळ जी ठरवेल ती भरण्यास तयार असल्याचे लेखी हमीपत्र मुख्याधिकारी, नांदगाव नगर परिषद, नांदगाव यांनी महामंडळास सादर केले आहे. तसेच याबाबत नांदगाव विधानसभा सदस्य मा.पंकज भुजबळ यांनी सदर जागा नगर परिषदेस नियमानुसार उपलब्ध करुन देणेबाबत शिफारस पत्र दिले आहे.

सदर विषयाच्या चर्चेत कार्यकारी संचालक यांनी वर नमूद ६०.७७ चौमी जागा नांदगाव नगर परिषदेस हस्तांतर केल्यावर शिल्लक जागा महामंडळाच्या भविष्यकालीन गरजांसाठी पुरेशी असल्याचे सांगितले. यावर सविस्तर चर्चा होऊन नियमानुसार जमिनीचे मुल्यांकन स्विकारुन आवश्यक जागा हस्तांतर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात आली.

"मान्य"

[ प्र.रा.भामरे ]
**कार्यकारी संचालक**
तापी पाटबंधारे विकास महामंडळ,
जळगाव

[ सुनिल तटकरे ]
**पदसिद्ध अध्यक्ष**
ता.पा.वि.म., जळगाव तथा
मा.मंत्री, जलसंपदा (महाराष्ट्र कृष्णा खोरे
विकास महामंडळ वगळून)
मंत्रालय, मुंबई

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव

## नियामक मंडळाची ४८वी बैठक दिनांक १३/६/२०१४
## बैठकीत पारित झालेले ठराव

ठराव क्र.४८.१ - ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या दिनांक २४/२/२०१४ रोजी झालेल्या ४७व्या बैठकीत पारित झालेले ठराव क्र-४७.१ ते ४७.१३ वाचून कायम करण्यात येत आहे.

ठराव क्र.४७.२ - ठराव करण्यात येतो की, "नियामक मंडळातील मान्य ठरावांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महामंडळ स्तरावर तपासून महामंडळाच्या स्वयंस्पष्ट अभिप्राय व करावयाच्या कार्यवाहीचा निश्चित कालावधी देण्याच्या अटीवर नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.३ - सदरचा ठराव अमान्य करण्यात आला.

ठराव क्र.४७.४ - ठराव करण्यात येतो की, "वाघुर प्रकल्पांतर्गत मौजे हिवरखेडा, ता.जामनेर या प्रकल्पबाधीत गावातील गट क्र-१८६/१ मधील संयुक्त मोजणी पत्रकात दर्शविलेल्या तथापी प्रत्यक्ष नुकसान भरपाई अदा न केलेल्या विहिरींच्या संपादन प्रस्तावानुसार रु.३.०९ लक्ष मोबदला देण्याच्या प्रस्तावास संबंधीत जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय घेऊन संबंधीत शेतकऱ्यास अदा करण्यास तसेच अशा स्वरुपाचे प्रस्ताव संबंधीत जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय घेऊनच सादर करावे या अटीसह नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.५ - ठराव करण्यात येतो की, "प्रकाशा बुराई उ.सिं.योजना, ता.जि.नंदुरबार योजनेच्या उर्ध्वगामी नलीका (Raising Main) तसेच पंप हाऊससाठी ३८.३३ हेक्टर क्षेत्र खाजगी वाटाघाटीने सरळ खरेदी करणेचा प्रस्ताव असून त्यासाठी प्रचलित शीघ्रगणकाच्या दराप्रमाणे (रु.२.६० लक्ष प्रति हेक्टर) एकुण अंदाजित किंमत रु.३.०८ कोटी खर्च प्रकल्पासाठीच्या उपलब्ध अनुदानातून करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

[प्र.रा.भामरे]
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

[सुनिल तटकरे]
मा.मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

ठराव क्र.४७.६ - ठराव करण्यात येतो की, "प्रकाशा बुराई उ.सिं.योजना, ता.जि.नंदुरबार योजनेच्या जॅक वेल, इनटेक पाईप तसेच पंप हाऊससाठी ०.५१ हेक्टर क्षेत्र खाजगी वाटाघाटीने सरळ खरेदी करणेचा प्रस्ताव असून त्यासाठी प्रचलित शीघ्रगणकाच्या दराप्रमाणे (रु.२.६० लक्ष प्रति हेक्टर) एकूण अंदाजित किंमत रु.४.७० लक्ष खर्च प्रकल्पासाठीच्या उपलब्ध अनुदानातून करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.७ - ठराव करण्यात येतो की, "नियोजित देवनाचा साठवण तलावाचे सर्वेक्षणाचे काम महामंडळांतर्गत उपलब्ध आस्थापनेकडून करुन घेण्यात यावे व अन्वेषणाचे काम (बोअरींग इ.) यांत्रिकी विभागाच्या कार्यक्रमात समाविष्ट करुन हाती घेण्यात यावे या दुरुस्तीसह सदर प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.८ - ठराव करण्यात येतो की, "निम्न तापी प्रकल्प पाडळसे, ता.अमळनेर पाडळसे गावठाण हद्दीतील संपादित होणाऱ्या अतिक्रमित २२ बाधितांच्या घरांचे जास्तीत जास्त रु.१ लक्ष प्रति घराप्रमाणे सानुग्रह अनुदान रु.२२ लक्ष संबंधीत जिल्हाधिकारी यांच्या संमतीनंतर अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.९ - ठराव करण्यात येतो की, "निम्न पांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्प ता.साक्री, जि.धुळे अंतर्गत डावा कालवा किमी १ मधील कंड्यूटच्या बांधकामाच्या निविदेंतर्गत कामाच्या व्याप्तीत बदल होत असल्याने चालू असलेल्या निविदांच्या बाबींवर १२५% पर्यंतची परिमाणे विचारात घेऊन उर्वरीत परिमाणासाठी नविन निविदा मागविण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

ठराव क्र.४७.१० - ठराव करण्यात येतो की, "जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदीवर वरखेडे लोंढे बॅरेज ते तापी नदीपर्यंत पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या एकूण ७ बंधाऱ्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सर्वेक्षणाचे काम उपलब्ध आस्थापनेकडून व भूशास्त्रीय अन्वेषणाचे काम यांत्रिकी विभागामार्फत करण्यात यावे या दुरुस्तीसह प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

| | |
|---|---|
| [प्र.रा.भामरे] | [सुनिल तटकरे] |
| कार्यकारी संचालक व सदस्य सचिव | मा.मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |

ठराव क्र.४७.११ - ठराव करण्यात येतो की, "महामंडळाचे नॉन-ऑपरेटिव्ह खाते क्र-२००२४९०३६०८ मधून रक्कम रु.३४०३८४९/- व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जळगाव यांचे बँक खाते क्र-२००२४९०३६६४ मधून रु.४७९४९५८४/- भूसंपादन न्यायालयीन प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालय, जळगाव यांचे आदेशानुसार बँकेतून परस्पर न्यायालयात जमा करण्यात आलेल्या रकमा महामंडळाच्या नॉन-ऑपरेटिव्ह खात्यातील रकमेतून समायोजित करण्यास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.१२ - ठराव करण्यात येतो की, "ओढरे ल.पा.तलाव, ता.चाळीसगाव, जि.जळगाव प्रकल्पासाठी मौजे ओढरे व विष्णूनगर भूसंपादन प्रस्ताव क्र-१/२००७ मधील निवाड्यात समाविष्ट नसलेल्या (सरकारी जागेवर बांधलेल्या) घरकुलाची रक्कम रु.१०.४७ लक्ष सानुग्रह अनुदान म्हणून संबंधीत जिल्हाधिकारी यांचे संमतीने व त्यांचेमार्फत अदा करण्याच्या दुरुस्तीसह नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४७.१३ - ठराव करण्यात येतो की, "वाघुर धरणाचे जलाशय व परिसराचा पर्यटन क्षेत्र म्हणून खाजगी विकासकाकडून बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकास करण्यासाठी जाहिर निविदा काढून आवश्यक ती कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४८.२ - ठराव करण्यात येतो की, "नियामक मंडळातील मान्य ठरावांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अवगत करण्यात आला."

ठराव क्र.४८.३ - ठराव करण्यात येतो की, "पुनंद मोठ्या प्रकल्पांतर्गत सुपळे डावा कालवा किमी १ ते ३ मध्ये पारंपारीक कालव्या ऐवजी बंदिस्त पाईप लाईनद्वारे पाणी नेण्याच्या प्रस्तावास व त्यासाठी येणाऱ्या रु.३५४.९० लक्ष खर्चाच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

| | |
|---|---|
| [प्र.रा.भामरे] | [सुनिल तटकरे] |
| कार्यकारी संचालक व सदस्य सचिव | मा.मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |

ठराव क्र.४८.४ - ठराव करण्यात येतो की, "बोरखेडा सांगवी ल.पा.योजना, ता.यावल, जि.जळगाव या योजनेच्या प्रस्तावित वितरीका क्र- १ व २ करण्यास व त्यासाठी आवश्यक जमिन देण्यास शेतकऱ्यांचा प्रखर विरोध असल्याने सदर वितरीका क्र- १ व २ वगळण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४८.५ - ठराव करण्यात येतो की, "ठराव करण्यात येतो की, ता.चाळीसगांव, जि.जळगाव येथील दरेगांव ल.पा.प्रकल्पास लाभधारक शेतकऱ्यांना प्रकल्पाची आवश्यकता नसल्याने सदरचा प्रकल्प रद्द करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडाळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४८.६ - ठराव करण्यात येतो की, "निम्न तापी प्रकल्पाचे सांडवा बांधकामात २२ मी.मी. व त्यापेक्षा मोठ्या आकाराचे लोखंड 'जिंदाल' कंपनीचे वापरण्यास स्विकृत निविदेतील अटी/शर्ती व लोखंडासंबंधी चाचणीच्या विनिर्देशांच्या (Sepecifications) नुसार शासनास सादर करावा.

ठराव क्र.४८.७ - ठराव करण्यात येतो की, "हतनूर धरणाच्या बुडीत क्षेत्रातील मौजे धामंदे, ता.मुक्ताईनगर येथील ७१ घरांचे संपादन होवून पुनर्वसन करणे व त्यासाठी येणाऱ्या रु.६.८१ कोटी खर्चाच्या प्रस्तावास शासनाची मदत व पुनर्वसन विभागाची मान्यता मिळण्याबाबत शासनास शिफारस करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४८.८ - ठराव करण्यात येतो की, "लोक सहभागातून पांझरा नदीवर कमी उंचीचे ३ बंधारे बांधण्यासाठी "मी धुळेकर" या सामाजिक संस्थेच्या विनंती अर्जानुसार धुळे शहर सुशोभीकरण करण्यासाठी (२ मी. उंचीचे व १ दलघफू क्षमतेच्या आतील) अटी व शर्तीसह सिंचन व्यवस्थापन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याच्या अटीवर बांधण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

| | |
|---|---|
| [प्र.रा.भामरे] | [सुनिल तटकरे] |
| कार्यकारी संचालक व सदस्य सचिव | मा.मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |

ठराव क्र.४८.९ - ठराव करण्यात येतो की, "जळगाव जिल्ह्यातील गिरणा नदीवर वरखेडे लोंढे बॅरेज ते तापी नदीपर्यंत, पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या एकूण ७ बंधाऱ्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल ६ महिन्यात तयार करण्यासाठी सर्वेक्षण व भूशास्त्रीय अन्वेषणाचे रु.१६४ लक्ष इतक्या रकमेचे काम उपलब्ध आस्थापनेकडून होऊ शकत नसल्याचे संबंधीत विभाग/मंडळाकडून समर्थन प्राप्त झाल्यास तसेच भूशास्त्रीय अन्वेषणाचे (बोअरिंग काम) यांत्रिकी विभागाकडून होऊ शकत नसल्याचे समर्थन प्राप्त झाल्यास सदरचे काम खाजगी अभिकरणामार्फत करण्यास नियामक मंडळाची सशर्त मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.४८.१० - ठराव करण्यात येतो की, "मौजे तांदलवाडी, ता.रावेर, जि.जळगाव येथील हतनूर प्रकल्पाचे जलाशयामुळे बाधीत होणाऱ्या अतिक्रमित घरांच्या संपादनाच्या प्रस्तावावर चर्चा होऊन सदर विषय मागे घेण्यात आला.

आयत्या वेळेचा विषय-

ठराव क्र.४८.११ - माणिकपुंज मध्यम प्रकल्प, ता.नांदगाव, जि.नाशिक धरणस्थळी संपादन केलेल्या जागेत नांदगाव शहर पाणी पुरवठा योजनेच्या switch room व इतर बांधकामासाठी ६०.७४ चौमी जागा नगर परिषद, नांदगाव यांचेकडून आवश्यक मोबदला घेऊन हस्तांतर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

"मान्य"

| | |
|---|---|
| [प्र.रा.भामरे] | [सुनिल तटकरे] |
| **कार्यकारी संचालक** | **पदसिद्ध अध्यक्ष** |
| तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव | ता.पा.वि.म., जळगाव तथा मा.मंत्री, जलसंपदा (महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ वगळून), मंत्रालय, मुंबई |